**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, APR-MAY, 2020, VOL- 8/39*

# मैत्री ... साहित्य आणि संगीताची !

**प्रा. अस्मिता नानोटी, Ph.D.**
*संगीत विभाग प्रमुख अशोक मोहोरकर कला व वाणिज्य महाविद्यालय अडयाळ, जि. भंडारा*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

शब्दांचा उपयोग संगीतात आणि संगीताचा उपयोग साहित्यात अगदी पौराणिक काळापासून होत आहे. सृष्टीच्या निर्मितीनंतर प्रथम ओम शब्द ध्वनी प्रगट झाला असे म्हटले जाते. सुक्ष्म दृष्टीने विचार केला असता असे सिध्द होते की, प्रथम स्वर निर्माण झाले, नंतर व्यंजनाची उत्पत्ती झाली असावी. शब्दांमुळेच साहित्य निर्माण झाले. सरस्वती मातेच्या एका हातात ज्ञान पुस्तिका आणि एका हाती विणा आहे हे सत्य सर्वांना ज्ञात आहे. वैदिक काळात सुध्दा ऋग्वेदातील ऋचा स्वरात म्हणण्याचा प्रघात होता. देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी असलेली स्तवने अथवा प्रार्थना या स्वरतालात बांधलेल्या असत. त्यामुळे संगीत आणि साहित्य यांचा एक अनोखा बंध तयार झाला. १२ व्या शतकात जयदेव हे प्रतिभावान कवी आणि संगीतज्ञ आपल्या 'गीत गोविंद' या ग्रंथाने अमर झाले. यात राधा—कृष्णासंबंधी प्रबंध गीते आहेत. त्याकाळी ही गीते कोणत्या रागात म्हणावी हे सुध्दा त्यांनी लिहून ठेवले आहे. काव्य म्हटले की ते गेय असते हे सर्वश्रुत आहे. भारतीय संस्कृतीचे सर्व धर्मग्रंथ काव्यमय आहे. स्कंदपुराणातील काव्य अर्थात साहित्य भगवान विष्णूच्या श्रीमुखातुन गाईले जाते. लव कुश काव्याव्दारे रामायण रघुरायाच्या नगरीत गातात. साहित्यकाव्याने इथे संगीताचे जीवाभावाचे नाते ओळखल्या जाते. प्राचिन मुर्तीकलेतही संगीताचा महिमा सर्वसाक्षी आहे म्हणून म्हणावेसे वाटते की संगीत हे अणूरेणूत व्यापले आहे.

**आध्यात्मिक उन्नतीचे मुळ संगीत**

संत कबीर आपल्या काव्यातून जनमनांस सांगातात, ''साधो! यह तन थाट तंबुरे का!'' हे साधुंनो! हे शरिरच तंबोरा आणि रागनिर्मितीचा थाट आहे. या तंबोऱ्याच्या तारा स्वरांत लावल्या असता, हरी नामस्मरण श्रवणीय होते. संत मीराबाई म्हणते की, हरि गुण गावत नाचूंगी मै, मी माझ्या हरीचे कृष्णाचे गुणगान करित सारखे नृत्य करित राहीन. संत रामदास, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर सर्व संतांनी आपल्या काव्यातुन, अभंगातून आध्यात्मिक उन्नतीचे मुळ संगीत आणि संत वाड्मय आहे हे सिध्द केले आहे. ''साहित्य म्हणजे संगीताशिवाय जीवन, म्हणजेच मिठाशिवाय भोजन आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत संगीताने आपले प्रतिनिधित्व अत्यंत निष्ठेने प्रतिपादन केले आहे.

साहित्य आणि संगीत ही भावअभिव्यक्तिची दोन प्रमुख साधने आहेत. शब्द आणि स्वर यातून मनाच्या वेगवेगळया अवस्था प्रकट करता येतात. वर्षानुवर्षाच्या संस्कारातून काही वाद्ये आणि विशिष्ट भावना यांचा अतुट संबंध निर्माण झाला आहे. सनई पावित्र्याशी, बासरी अध्यात्म आणि भक्तिशी, ढोल ताशे उत्सव प्रियतेशी, बँड व इतर तत्सम वाद्ये सैनिकी जोशाशी, संतूर वादय मनातील हळव्या भावनांच्या तरंगांशी, सतार आणि सारंगी कारूण्याशी संवाद साधण्यात यशस्वी झाल्या आहेत. यात शब्द नसतात पण विशिष्ट भाव निर्माण करण्याची जबरदस्त शक्ती असते. कुठलाही भाव किंवा भावना यांना आकार नसतो. त्या निर्गुण निराकार असतात. त्यांना आकार देऊन दुसऱ्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य साहित्य किंवा संगीत करते.

**शब्दस्वरांचा कारूण्य भाव**

शब्दातील भावनांना, शब्दातील गतीला सर्वसाधारण रूप देण्याचे कार्य संगीत करते. ''ने मजसी ने परत मातृभूमीला'' हे गीत जर उदाहरण म्हणून घेतले तर गीत विशिष्ठ चालीत, गतीत म्हटले तर त्यातून जो कारूण्याचा भाव निर्माण होणे अपेक्षीत आहे. तो उत्पन्न होईल. परंतु हे गीत एखाद्या लहान मुलाने नुसतेच म्हटले अथवा वेगवेळया वयोगटातील माणसांनी नुसते, स्वरतालाचा आधार न घेता, गाईले तर त्यातून अपेक्षित भाव अभिव्यक्त होणार नाही.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

स्वर—तालातील विशिष्ट विरहयुक्त बंदिशीमधे जेव्हा 'ने मजसी ने' हे शब्द चपखलपणे जाऊन बसतात, तेव्हा ते जीवंत होऊन अपेक्षित परिणाम साधू शकतात. काही संगीतकार म्हणतात शास्त्र न जाणणाऱ्या श्रोत्यांना रिझवील तेच खरे संगीत आहे.

**संगीताने बोलके केले साहित्याला**

साहित्य सांगते संगीताने निसर्गावर परिणाम होतो. रोपांची वाढ होते, गाई—म्हशी दूध देतात. माणसांचा रक्तदाब कमी करणे, ज्वर कमी करणे एकंदरीत रोगनिवारण करण्याची शक्ती संगीतात आहे. साहित्य म्हणते, 'मला अर्थ आहे. मला बोलके संगीतानेच केले आहे. संगीताच्या तरंगात प्रचंड शक्ती आहे. सांगितिक परिणाम, त्याची प्रचिती संशोधनाशिवाय कशी समोर येईल? संगीत म्हणजे गानसरस्वतीच्या मंदिरात प्रवेश करायचा असेल तर सात शुध्द स्वरांच्या चार कोमल स्वरांच्या आणि एक तिव्र स्वराच्या अशा बारा पायऱ्या चढाव्या लागतात. तरच माता सरस्वतीचे दर्शन होते. हे सर्व संगीत साधकांना ज्ञात आहे आणि हे सर्व करण्यासाठी साधना करावी लागते. साहित्य म्हणजे संगीतकला साध्य करायची असेल तर आकांक्षेला प्रयत्नांची जोड देऊन साधना करा. सप्तसुरांचा स्वर्ग जवळच आहे.

साहित्यकार वि.स. खांडेकर म्हणतात. '' संगीतकला ही जीवनाची सावली आहे. एक साहित्यकार संगीताचा महिमा कथन करित असतांना म्हणतात केवळ मधुर कंठ असुन काय उपयोग, त्यासाठी साधना हवी, प्रत्येक स्वर भावनेने भिजलेला असेल तरच श्रोत्यांच्या भावना ओलावतात आणि यासाठी एकाग्रता, निष्ठा व चारित्र्य हवे. तरच सप्तस्वर साधतात प्रसन्न होतात. साहित्याने अनेक प्रकारे संगीताचे गुणगान केले आहे. साहित्य म्हणजे कोणत्याही कलेचे सुगंधित फुल हवे असेल तर प्रयत्नांची बाग करून घामाचे पाणी घालावे लागते.

**साहित्य संगीत जुळी भावंड**

तसे पाहिले तर साहित्य आणि संगीत यांची सांगड घालण्याची वहिवाट जुनीच आहे. सामान्यत: संगीतात शब्दाचे स्थान दाखविणारी भरपूर सामुग्री आपल्या प्राचीन संस्कृत ग्रंथात सापडते. संगीत दर्पणकाराने म्हटले आहे.

''नादेन सज्यर्त वर्णत: पदं वर्णात पदाब्दच:।
वचसो व्यवहारोयं नादाधीनमिदं जगत्।।

प्राणिमात्राला आपले विचार अभिव्यक्त करण्यासाठी वा अनुभव प्रकट करण्यासाठी नादाचा दोन प्रकारे उपयोग करावा लागतो. १) वर्णरूप, २) स्वररूप ३) वर्णरूप नाद व्याकरण, शास्त्र, न्याय वगैरेवर चर्चा करतो तर स्वररूप नाद हा संगीतशास्त्राचा विषय होय. तेव्हा संगीतातील स्वररूप शब्द आणि साहित्यातील वर्णरूप शब्द हे जुळया भावंडाप्रमाणे आहेत. म्हणून साहित्य व संगीत हे अन्योन्याश्रीत आहेत. या दोहोंचा पारस्परिक संबंध इतका घनिष्ठ आहे की त्यांना परस्परांपासुन वेगळे करताच येणार नाही. चित्र, वास्तू शिल्प याप्रमाणे साहित्य व संगीत याही ललितकलाच आहे. आणि त्या मानवी जीवनाशी निगडीत आहेत. दोन्ही कलांमधुन भावनाभिव्यक्ति होते फक्त त्यांच्या अभिव्यक्तिची साधने वेगवेगळी आहेत. संगीत स्वरांव्दारे तर साहित्य वर्णशब्दांव्दारे भावनाभिव्यक्ती करते. दोन्हींचा इच्छित व अपेक्षित परिणामही एकच आहे व तो म्हणजे जनरंजन. मनुष्याला देहभान विसरावयास लावण्याची शक्ती या दोन्ही कलांत असली तरी संगीत साहित्यापेक्षा अधिक परिणामकारी आहे. कारण, संगीत हे सरळ श्रोत्यांच्या अंत:करणाला जाऊन भिडते. साहित्यात भाषेचा प्रश्न असतो पण स्वराची भाषा ही सर्व प्राणीमात्रास समजू शकते. हे अनुभव सिध्द आहे. म्हणूनच जेथे शब्द संपतात तेथून संगीत सुरू होते. असे रविंद्रनाथ टागोर म्हणतात.

**साहित्य संगीताचा मेळ**

आपण जेव्हा एखादे भजन ऐकतो तेव्हा त्यातील शब्द सुरांना घेऊन त्याची भक्तिरसात्मक भूमिका श्रोत्यांना विषद करतात. त्यातून जर साथसंगत समर्थ असली तर मनात भक्तिरसाचे झरे उत्पन्न होऊ लागतात. परंतू तो गायक त्यात यथायोग्य आलापी करून पुन्हा मुळ पदावर येतो. तेव्हा झरे खळाळत वाहू लागतात. त्यातून जर भजनात चार किंवा पाच चांगले समर्थ गायक असले तर आलाप, बोल—आलाप, ताना यांनी असा काही रंग भरतात की श्रोते

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

भक्तिरसात अक्षरशः आकंठ बुडून न्हाऊन निघतात. उदा. अनुप जलोटाजींचे भजनात शब्द स्वरांचा सुरेख संगम साधतात. समर्थ अशा साथ संगतीत, भक्तिरसाचा परिपोष करतात परंतू चार कडवी म्हटली की त्यांचे गाणे (भजन) संपते त्या भजनातून आनंदही चार कडव्यांपुरताच मिळतो. तो आनंद मर्यादित असतो परंतू पं. जसराज जेव्हा भजन गातात तेव्हा अमर्याद आनंदाची पर्वणी असते. सांगण्याचा उद्देश हाच की साहित्य आणि संगीताचा मेळ जमला की शब्द जीवंत होतात. त्यात चैत्यन्याचे तेज निर्माण होते आणि नंतर ताना—आलापाव्दारे प्रकट होणाऱ्या नादब्रम्हाला तो विशिष्ठ भावभावनेच्या रसाच्या वातावरणाचा आकार देतात. स्वर ही दैवी, अखिल ब्रम्हांडाची भाषा आहे. जेव्हा दोन्ही भाषा एकमेकातील अर्थ मानवाच्या समोर ठेवतात, तेव्हा मानव मुग्ध होऊन ती कलाकृती श्रवण करतो.

**निष्कर्ष**

१) काही गीतप्रकार शब्दप्रधान असतात. शब्दांना स्वरांपेक्षा त्यात महत्व जास्त दिल्या जाते. जसे भजन, ठुमरी, नाटयगीत, कजरी.

२) शास्त्रीय संगीताच्या मैफीलीत सुरप्रधान गायकीला महत्व दिले पाहिजे.

३) संगीताच्या प्रचार व प्रसारासोबत संगीताला ऐश्वर्यसंपन्न बनविण्यात साहित्याचे योगदान मोलाचे आहे.

४) संगीत हे केवळ मनोरंजनासाठी नसून जर त्याला भावना आणि प्रेरणांनी सुसज्य केले तर ते केवळ ऐकणाऱ्यालाच नव्हे तर परिसरातील वातावरण श्रेयस्कर तरंगीत करण्यासाठी सहाय्यक होऊ शकेल.

**संदर्भग्रंथ**

*संतसाहित्य एक अनुबंध — डॉ. अशोक कामत*
*संतसाहित्य — सौंदर्य आणि सामर्थ्य — डॉ. निर्मलकुमार फडकुले*
*संगीत कला विहार*
*संगीत निबंधावली — किरण फाटक*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*